सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in
Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्र. १४४२(२)(२)/२०१९/तेवीस दिनांक : १ जून, २०२२.

# -: प्रसिध्दीपत्रक :-

विषय:- महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट - ब मुख्य परीक्षा- २०१९
पोलीस उपनिरीक्षक संवर्गाचा सुधारित अंतिम निकाल
संदर्भ:- जाहिरात क्रमांक ०१/२०१९ व अधिसूचना क्र.०८/२०१९

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक २८ जुलै, २०१९ (पेपर क्र.१) व दिनांक ४ ऑगस्ट, २०१९ (पेपर क्र.२) रोजी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट - ब मुख्य परीक्षा - २०१९ मधील पोलीस उपनिरीक्षक संवर्गाच्या एकूण ४९६ पदांपैकी ४९४ पदांचा अंतिम निकाल दिनांक २५ मार्च, २०२२ रोजी जाहीर करण्यात आला होता. तथापि मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे दाखल मुळ अर्ज क्रमांक २९५/२०२२ या न्यायिक प्रकरणी मा. न्याधिकरणाने दिनांक ४ एप्रिल, २०२२ रोजी दिलेले आदेश विचारात घेऊन दिनांक १ जून, २०२२ रोजी सुधारित अंतिम निकाल जाहीर करण्यात आला आहे.

२. उमेदवारांच्या माहितीसाठी प्रस्तुत निकाल व प्रत्येक प्रवर्गाकरीता शिफारसपात्र ठरलेल्या शेवटच्या उमेदवाराचे गुण (cut off marks) आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहेत.

३. प्रस्तुत परीक्षेच्या अंतिम निकालामध्ये अनाथांसाठी आरक्षित २ पदे रिक्त ठेवण्यात आली आहेत.

४. प्रस्तुत परीक्षेचा निकाल मा. न्यायालयात / मा. न्यायाधिकरणामध्ये दाखल करण्यात आलेल्या विविध न्यायिक प्रकरणांमधील अंतिम न्यायनिर्णयाच्या तसेच वयोमर्यादेमध्ये सवलत घेतलेल्या मागासवर्गीय उमेदवारांचा अराखीव (खुला) पदावरील निवडीकरिता शासनाच्या धोरणाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे.

५. प्रस्तुत अंतिम निकालातील ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेतील गुणांची पडताळणी करावयाची आहे अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्रोफाईलवर पाठविल्याच्या दिनांकापासून १० दिवसांत, आयोगाकडे ऑनलाईन पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. (कृपया आयोगाच्या संकेतस्थळावरील "उमेदवारांना सर्वसाधारण सूचना" मधील सूचना क्रमांक ६.४.४ पहावे)

दिनांक : १ जून, २०२२
ठिकाण : मुंबई

उपसचिव (परीक्षोत्तर) (अ.प.)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग